## मित्रमंडळ एज्युकेशन सोसायटीचे,

# सरिता विद्यालय प्राथमिक व सौ. सुंदरदेवी राठी हायस्कूल

## वार्षिक स्नेहसंमेलन अहवाल सन २०१७-१८

गुरूवार दि. १५ जून २०१७ रोजी इंद्रधनू बालवाडी, सरिता प्राथमिक विद्यालय व सौ. सुंदरदेवी राठी हायस्कूल शाळांची सुरूवात झाली. ज्येष्ठ, श्रेष्ठ विभूतींचे पूजन करून व पूर्व प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांचे औक्षण करून स्वागत केले. शाळेत १ ली ते १० वी चे प्रत्येकी १ वर्ग असून पूर्व प्राथमिक - ५०, प्राथमिक -२४२ व माध्यमिक - १५३ असे एकूण ४४५ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. प्राथमिक व माध्यमिकविभाग पूर्ण अनुदानित आहेत. शासनातर्फे १ ली ते ८ वी च्या विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके, स्वाध्याय पुस्तिका व शालेय पोषण आहार मोफत दिला जातो. पोषण आहार चविष्ट व स्वादिष्ट असतो. मार्च २०१७ मध्ये, एस.एस.सी.बोर्ड परीक्षेचा निकाल ८८.६३% लागला आहे. प्रथम क्रमांक कु.हेमंत कांबळे हा विद्यार्थी ८६.८०% गुण मिळवून यशस्वी झाला. शिक्षक, मुख्याध्यापक , पदाधिकारी यांनी विद्यार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले त्याबद्दल त्यांचे आभार. विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांना स्नेहसंमेलनात पारितोषिके दिली जातात.

शालेय अभ्यासक्रमाबरोबर राष्ट्रीय सण व सांस्कृतिक कार्यक्रम नियोजनपूर्वक पण नावीन्यपूर्ण साजरे केले जातात. ई-लर्निंग, संगणक व तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शनाद्वारे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी प्रयत्न केले जातात.

२१ जून २०१७ हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा केला. यावेळी योगासन , प्राणायमाचे महत्व मा. श्री. रविंद्र कुलकर्णी यांनी सांगितले. या प्रसंगी मा. सौ. स्वाती भावे (महामात्रा) व मा. सौ. प्रतिमा करंदीकर उपस्थित होत्या. रमजान ईद निमित्त मुस्लिम विद्यार्थ्यांना शुभेच्छा पत्र देऊन साजरा केला. मा. सौ. सीमा जोशी यांनी गुरूपोर्णिमेचे महत्त्व विद्यार्थ्यांना अनेक गोष्टीतून सांगितले. माध्यमिक विभागात गुरूपोर्णिमेनिमित्त पालक-शिक्षक संघातर्फे गरजू व गुणवंत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप केले.

इ.१० वी बोर्ड परीक्षेत प्रथम आलेल्या तीन क्रमांकांच्या विद्यार्थी व पालकांचा सत्कार मा.प्रा.सिद्धार्थ जाधव यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा.सौ.स्वाती भावे उपस्थित होत्या. या प्रसंगी प्रमुख पाहुणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

याशिवाय लोकमान्य टिळक पुण्यतिथी, नागपंचमी, दिपपूजन, पालखी सोहळा, दहिहंडी अशा कार्यक्रमांचे आयोजन केले. या प्रसंगी वक्तृत्व स्पर्धा, कथावाचन, मेहंदी स्पर्धा, हस्ताक्षर स्पर्धांचे आयोजन केले. रक्षाबंधनानिमित्त प्राथमिक विभागात राखी बनवा स्पर्धा आयोजित केली. इ.१० वी तील विद्यार्थीनींनी दत्तवाडी पोलिस चौकी येथे पोलिसांना राखी बांधून रक्षाबंधन साजरे केले. आपुलकी संस्था आयोजित 'बँक व्यवहार' विषयी मा. श्री विद्याधर अनास्कर यांनी इ.८ वी ते १० वी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. क्रांतिदिनानिमित्त क्रांतिकारकांच्या प्रतिमेचे पूजन केले व इ.५ वी ते ७ वी विद्यार्थ्यांची निबंध स्पर्धा घेण्यात आली. तर इ.८ वी ते १० वी विद्यार्थ्यांसाठी मा. श्री. विश्वास गांगुर्डे (माजी आमदार) यांचे स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकर यांचे जीवनचरित्र विषयावर व्याख्यान झाले.

स्वतंत्र भारताचा ७१ वा स्वातंत्र्यदिन ध्वजवंदनाने क्रीडांगणावर साजरा केला. वीरमाता गीता गोडबोले यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी समूहगीत व प्रात्यक्षिके सादर केली. गोकूळ अष्टमी निमित्त इ.१ ली ते ४ थी चा दहिहंडी कार्यक्रम उत्साहात साजरा केला. Quick Heal Foundation तर्फे इ. ५ वी ते १० वी विद्यार्थ्यांना सायबर क्राईम, इंटरनेटचे फायदे व दुष्परिणामांची माहिती देण्यात आली.

**गणेशोत्सव :-**

सालाबादप्रमाणे या वर्षी शाळेत 'गणेशोत्सव' उत्साहात साजरा करण्यात आला. 'सर्वधर्मसमभाव' हा देखावा इ. ८ वी ते १० वी तील विद्यार्थ्यांनी सादर केला. इ. ८ वी ते १० वी साठी नाट्यवाचन स्पर्धा, पक्षी निरीक्षण - मा. मिलिंद केळकर यांचे व्याख्यान आयोजित केले. इ.१ ली ते ४ थी विद्यार्थ्यांसाठी हस्ताक्षर स्पर्धा व इ.५ वी ते ७ वी विद्यार्थ्यांसाठी प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली. शाळेची माजी विद्यार्थीनी सौ.पोर्णिमा दारवटकर हिने ट्रेकिंग विषयी माहिती दिली.

**शिक्षकदिन :-**

५ सप्टेंबर 'शिक्षक दिन' साजरा करण्यात आला. या प्रसंगी मा.डॉ. शरद कुंटे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. याप्रसंगी सौ. वैशाली नेरळ, सौ.भाग्यश्री सुपनेकर, श्री किशोर पवार यांना संस्थेतर्फे आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला. श्री. सतिश घाणेकर यांना पुणे जिल्हा मुख्याध्यापक संघातर्फे जिल्हास्तरीय गुणवंत शिक्षकेतर कर्मचारी पुरस्कार मिळाला आहे. सर्व पुरस्कारीत शिक्षकांचे व शिक्षकेतरांचे मन:पूर्वक अभिनंदन !

**इतर सहशालेय उपक्रम :-**

१) वाचन प्रेरणा दिन,पुस्तक प्रदर्शन, विद्यार्थी दिन, बालदिन, यासारखे उपक्रम घेतले जातात.

२) इ.१० वी विद्यार्थ्यांसाठी Life School संस्थेतर्फे उल्लेखनीय उपक्रम घेण्यात आला. विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढावा व त्यांच्या गुणवत्तावाढीसाठी सदर उपक्रमाचे आयोजन केले होते. मा.डॉ. तुषार सुकळीकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

३) प्राथमिक विभाग :- दि. ०७/११/१७ रोजी विद्यार्थी दिन साजरा केला. प्रमुख पाहुण्या सौ. स्नेहल कुलकर्णी (माजी मुख्याध्यापिका) यांनी गोष्टीरूपाने विद्यार्थी दिनाचे महत्व सांगितले.

४) भारतीय स्त्री शक्ती जागरण संस्थेमार्फत समस्या प्रधान विद्यार्थ्यांसाठी समुपदेशन केले जाते. मा. सौ. समृद्धी देशमुख समुपदेशन करतात.

५) ध्रुव अॅकॅडमी तर्फे अभ्यासात गती कमी असलेल्या विद्यार्थ्यांना विशेष प्रशिक्षण दिले जाते.

६) इ. ५ वी ते ९ वी गणित विषयात अप्रगत विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन वर्ग चालू आहेत. या वर्गात श्री. अजित भिडे हे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात.

७) इ.१० वी साठी तज्ञ विषय शिक्षकांची व्याख्याने आयोजित केली जातात.

८) प्रथम फाऊंडेशन तर्फे इ.१ ली ते ४ थी तील विद्यार्थ्यांकरीता वाचन प्रकल्प हा विशेष उपक्रम शाळेनी सुरू केला आहे.

या सर्व संस्थांचे आम्हाला बहूमोल सहकार्य असते. त्याबद्दल शाळा त्यांची ऋणी आहे.

- **इंटरअॅक्ट क्लब** :- NIBM रोटरी क्लब यांच्या सहकार्याने इ.८ वी, ९ वी इंटरअॅक्ट क्लबची स्थापना करण्यात आली. मा. श्री. मकरंद टिल्लू यांनी पाणी बचतीचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. तसेच क्लब तर्फे प्रश्नमंजूषा स्पर्धा आयोजित करण्यात आली.
- **With U Foundation** :- या संस्थेतर्फे हुशार विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तके व आर्थिक मदत देण्यात आली. इ.९ वी साठी कार्यशाळेचे आयोजन केले. मा. श्री. सुभाष कर्णिक यांनी मार्गदर्शन केले.
- **डॉ. बाबासाहेब जयकर व्याख्यानमाला** :- ग्रामीण विकास व प्रशिक्षण संस्था आयोजित डॉ.बाबासाहेब जयकर व्याख्यानमाला इ ८ वी ते १० वी विद्यार्थ्यांकरीता आयोजित केली होती. मा.सौ. उज्वला कुलकर्णी, मा.श्री. मुबीन तांबोळी व मा.श्री.झुंबरराव खराडे यांची अनुक्रमे ''हास्यरंजन'', ''बंड्याची हास्य हांडी '', ''व्यसनमुक्ती'' या विषयांवर व्याख्याने झाली. सदर

व्याख्याने विनोदी व मनोरंजक असल्याने विद्यार्थ्यांनी खूप आनंद घेतला. संस्थेचे मानद विश्वस्त मा.श्री.सु.य.दांडेकर व मा.श्री.गिरीश चिटणीस यांचे सहकार्य मिळाले. त्याबद्दल शाळा त्यांची सदैव ऋणी आहे.

- **बाह्यस्पर्धा परीक्षा :-** इ.५ वी ते ७ वी चे विद्यार्थी राष्ट्रभाषा, टि.म.वि.इंग्रजी, गणित परीक्षेला बसविले जातात. इ. ५ वी ते ८ वी चे विद्यार्थी शासकीय शिष्यवृत्ती परीक्षेला बसलेले आहेत. शिक्षक या विद्यार्थ्यांना ज्यादा मार्गदर्शन करतात. शासकीय चित्रकला ग्रेड परीक्षा एलिमेंटरी व इंटरमीजीएट परीक्षेत विद्यार्थ्यांनी उत्तम यश मिळवले आहे. इ.८ वी NMMS शिष्यवृत्ती परीक्षा, इ.१० वी NTS परीक्षा, इ. ९ वी टि.म.वि.इंग्रजी परीक्षा इत्यादी बाह्यस्पर्धा परीक्षांमध्ये विद्यार्थी सहभागी होतात. सर्व शिक्षक या विद्यार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन करतात.

  बाह्यस्पर्धांमध्ये निबंध, वक्तृत्व, समूहगीत, चित्रकला, नाट्यवाचन, उतारावाचन, प्रश्नमंजुषा इत्यादी स्पर्धेत विद्यार्थी सहभागी होतात व उत्तम यश संपादन करतात. कबड्डी, ज्युडो कराटे इ. क्रीडा स्पर्धा मध्ये शाळेचा संघ सहभागी होतो.

- **आरोग्य तपासणी :-** दरवर्षी शाळेतील विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी केली जाते. 'आरोग्य भारती' पुणे यांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांची तपासणी दि.१२ व १३ डिसेंबर रोजी केली जाणार आहे. इ. ७ वी तील सर्व विद्यार्थ्यांचे हिमोग्लोबीन तपासणी करण्यात येणार आहे.
- **प्रदर्शन :-** भूगोल दिनानिमित्त 'ऋतू' या विषयावर दि. १३/०१/१८ रोजी प्रदर्शन आयोजित करण्यात येणार आहे.

**शैक्षणिक सहल :-**

शुक्रवार दि.०८/१२/१७ रोजी शाळेची सहल कृषी पर्यटन ,'मेहेर रिट्रिट' व भुलेश्वर येथे आयोजित केली होती. प्राथमिक विभागातील सर्व वर्गांच्या शैक्षणिक सहली जानेवारी २०१८ मध्ये जाणार आहेत.

प्राथमिक व माध्यमिक विभागात शाळा व्यवस्थापन समिती, पालक शिक्षक संघ, पर्यावरण मंडळ या समित्या कार्यरत आहेत. त्यांच्या वेळोवेळी सभा होतात. तसेच पालक सभा, पालक कार्यशाळा पूर्व नियोजनानुसार होतात. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगती करीता शाळेत सुसज्ज विज्ञान प्रयोगशाळा, ग्रंथालय, संगणक कक्ष, आय. सी.टी. विषयांकरीता लॅन केलेली व इंटरनेट सुविधा उपलब्ध आहे. सर्व वर्ग इ-लर्निंग वर्गात अध्ययन करतात. शाळेच्या परिसरात CCTV Camera

बसविलेले आहेत. या सर्व सुविधा संस्थेने उपलब्ध करून दिल्या या बद्दल शाळा संस्थेची ऋणी आहे.

ग्रंथालयात शिक्षकांकरीता १५३५ पुस्तके व विद्यार्थ्यांकरीता ४१११ एवढी पुस्तके आहेत. शिक्षणप्रेमी व्यक्ती, विविध सामाजिक संस्था, रोटरी क्लब, खासदार, आमदार निधीतून देणगी रूपाने दरवर्षी ग्रंथालयाला पुस्तके दिली जातात.

संस्थेचे अध्यक्ष व सर्व पदाधिकारी यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य शाळेला सतत मिळत असते. त्यामुळेच शाळांच्या प्रगतीचा आलेख उंचावत आहे. त्याबद्दल आम्ही त्यांच्या ऋणातच राहू इच्छितो.

संस्थेस अर्थसहाय्य व वस्तुरूपाने देणगी देणाऱ्या दानशूर व्यक्तींबद्दल ऋणनिर्देश स्नेहसंमेलनादिनी आपल्या समोर येईलच.

धन्यवाद !

आपले विश्वासू

सौ. साधना जोशी
मुख्याध्यापिका
मि. मं. एज्यु. सोसायटीचे
सरिता विद्यालय प्राथमिक
पुणे - ४११ ००९

श्री. सुजित जगताप
मुख्याध्यापक
मि. मं. एज्यु. सोसायटीचे
सौ. सुंदरदेवी राठी हायस्कूल
पुणे - ४११ ००९